MHTH170004042022

**नियमित दावा क्र. २२/२०२२ मधील**
**नि.क्र. ७ खालील आदेश**
**अपराजीता नंदकेयुलीयार व इतर**
**वि.**
**कमरुलहुदा हमीदुल्लाह खान व इतर**
**(दिनांक १५.०२.२०२२)**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या आदेशिका २६ प्रमाणे कोर्ट कमिशनर नेमूण दावा मिळकतीची मोजणी करणेकामी अर्ज सादर केलेला आहे.

२. वादीच्या कथनाप्रमाणे गट क्र. ३७५ मधील क्षेत्र ०—२७—०० हे. आर. मौजे हालोली, ता. व जि. पालघर ही जमिन वादी यांच्या मालकी व कब्जेवहिवाटीत आहे. प्रतिवादी हे सदर मिळकतीच्या लगतचे कब्जेदार असून गट क्र. ३७७/१, ३७७/२ आणि ३७७/अ या जमीनीचे मालक आहेत. प्रतिवादी हे वादी यांच्या मिळकतीत त्यांच्या मिळकतीच्या हद्दी दाखविण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे संपुर्ण वस्तूस्थिती तपासून पाहण्याकरीता गट क्र. ३७७/१, ३७७/२ आणि ३७७/अ यांचे कोर्ट कमिशनरद्वारे संयुक्त मोजणी करुन हद्द निश्चत करणे आवश्यक आहे. प्रतिवादी हे दावा मिळकतीच्या हद्दी संदर्भात वाद निर्माण करीत असल्यामुळे कोर्ट कमिशनरची नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती वादी यांनी केली.

३. प्रतिवादी यांनी नि.क्र. २० वर म्हणणे सादर करुन वादीचे सर्व कथने अमान्य केले. प्रतिवादींनी असे म्हणणे सादर केले की, गट क्र. ३७५ ची जमिन ही राष्ट्रीय महामार्गाकरीता संपादीत झालेली आहे. वादीने गट क्र. ३७५ ची जमिन ही सन २०२१ मध्ये विकत घेण्यापुर्वी त्याची मोजणी करुन घेतलेली नाही. केवळ ७/१२ उतारा पाहून गट क्र. ३७५ हे विकत घेतलेले आहे. तसेच प्रतिवादींनी केलेल्या मोजणी अर्जास वादी यांनी हरकत घेतलेली आहे. प्रस्तुत दाव्यात कोर्ट कमिशनरची नेमणूक करणे म्हणजेच पूरावा गोळा करणे असे होईल त्यामुळे कोर्ट कमिशनर यांची नियुक्ती सदर दाव्यात करता येणार नाही.

प्रतिवादींच्या विधिज्ञांनी *Civil Revision Application No. 990 of 1998, decided on 15.09.2000, Sanjay son of Namdeo Khandare Vs. Sahebrao s/o Kachru Khandare Others,* च्या न्यायनिवाडयाची प्रत अभिलेखावर दाखल केली.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता, प्रस्तुतचा दावा हा मनाई हुकूमासाठी आणि कोर्ट कमिशनर यांची नियुक्ती करुन मोजणी करुन घेण्यासाठी दाखल केलेला आहे. वादीने मुळ दाव्यात उपअधिक्षक, भुमी अभिलेख, पालघर यांच्या कार्यालयामार्फत दावा मिळकतीची मोजणी करुन मिळावी अशी मागणी केली आहे. प्रस्तुतचा अर्ज देखील दावा मिळकत आणि प्रतिवादी यांच्या मालकीच्या जमिनीची संयुक्त मोजणी करणेकामी दिलेला आहे. प्रस्तुतचा अर्ज हा मंजूर केला तर मुळ दाव्यातील मागणी ही दाव्याच्या अंतरीम स्थितीत मंजूर झाली असे होईल. तसेच दावा हा केवळ कायमस्वरुपी मनाईहुकूमासाठी असल्याकारणाने कोर्ट कमिशनरची नेमणूक करणे म्हणजे पूरावा गोळा करणे या करीता होईल. कोर्ट कमिशनरची नेमणूक ही पूरावा गोळा करण्याकरीता करता येत नाही हे न्यायाचे तत्व आहे. तसेच वादी यांनी प्रतिवादींनी त्यांच्या जमिनीमध्ये अतिक्रमण केल्याचे त्यांच्या वादपत्रात कोणतेही कथन केलेले नाही. अशा स्थितीत कोर्ट कमिशनर नेमणे हे न्यायोचित नाही. प्रतिवादी यांनी सादर केलेल्या न्यायनिवाडा हा प्रस्तुत प्रकरणाच्या वस्तुस्थितीत लागू पडतो.

५. वर नमूद केलेल्या कारणमिमांसेवरुन प्रस्तुतचा अर्ज हा नामंजूर होणेस पात्र आहे. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :—

**—: आदेश :—**

१. अर्ज नि. क्र ७ हा नामंजुर करण्यात येत आहे.

२. खर्चा संदर्भात कोणताही आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SWATI HARISHCHANDRA TELGAONKAR
Date: 2022.02.15 16:16:16 +0530

पालघर
दिनांक: १५/०२/२०२२.

(एस.एच.तेलगांवकर)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
पालघर.

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Shri. S. S. Modke |
| Court of | : | 3rd Civil Judge Jr. Dn. & J.M.F.C., Palghar |
| Date of pronouncement of order | : | 15-02-2022 |
| Order signed by the Presiding Officer | : | 15-02-2022 |
| Order uploaded on | : | 15-02-2022 |